साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–मारोती दशरथ कायरकर,
वय:–६१ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

१. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणतेही जप्तीपंचनामे केले नाही. आता मला पाच जप्ती पंचनामे दाखविण्यात आले त्यावर माझ्या सह्या नाही त्यातील मजकुर मला माहीती नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०८/२०१८ रोजी पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार केला व माझ्यासमक्ष लोभा शिवराम मेंघरे यांच्याकडुन एक बाजेची(चारपाई) काठी, एक फुल बाहीचा पांढ–या रेघा असलेला शर्ट व एक निळसर रंगाचा फुल पॅंट जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष सदर एक पांढ–या रंगाचे मळकट बंगाली फुल बाहीचा शर्ट, एक पांढ–या रंगाचा पायजामा, एक बाजेची काडी, एक फुल बाहीचा फिक्कट निळसर रंगाचा शर्ट, एक नाईट पॅंट, एक लोखंडी सळाख, एक फुल बाहीचा निळसर रंगाचा शर्ट, एक काळसर रंगाचा पॅंट, एक पांढ–या निळसर रंगाच्या रेघा असलेला फुल बाहीचा शर्ट व एक काळसर रंगाचा फुल पॅंट इ. वस्तु जप्त केल्या होत्या व त्याप्रमाणे माझ्यासमक्ष जप्तीपंचनामे पोलिसांनी तयार केले व त्यानंतर मी त्यातील मजकूर वाचुन व समजुन त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.चिंचघरे मॅडम यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२२/१२/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड